कार्यालय पोलीस अधीक्षक, गडचिरोली
दिनांक ०२.१२.२०१८

# वार्तापत्र

## '' आम्हाला भिती व बळजबरीने नक्षल सप्ताह पाळायला लावाल तर याद राखा ''

नक्षलवाद्यांनी नक्षल सप्ताह निमित्ताने ठिकठिकाणी बॅनर्स व पोस्टर्स लावून गावक-यांना नक्षल सप्ताह पाळण्याचे आव्हान केले होते. परंतु या आव्हानास न जुमानता गावक-यांनी आपण नक्षल सप्ताह का म्हणुन पाळायाचा ? असा पवित्रा घेतला आहे.

गेली अनेक वर्षे माओवाद्यांनी आमच्या अज्ञानाचा फायदा घेत आम्हाला जाणीवपूर्वक शैक्षणिक,सामाजिक,आर्थिक बाबतीत जगा पासून दूर कश्या रीतीने ठेवता येईल हेच पाहिले आहे. परंतू या नंतर मात्र आम्ही नक्षलवादास कदापि साथ देणार नसून नक्षलवाद्यांना आमचा विकास नकोसा असून त्यांनी आमच्यावर फक्त अन्याय अत्याचाराच केले आहेत.गेली अनेक वर्षापासून आदिवासी बांधवांची अत्यंत क्रूरपणे निघृण हत्या करणे, विकासकामांच्या ठिकाणी वाहनांची जाळपोळ करुन आमच्या मनात भिती निर्माण करणे यासारखे प्रकार ते करत आहेत. मात्र आम्ही या असल्या गोष्टींना घाबरणार नसून आम्हाला बळजबरीने व भीती दाखवत नक्षल सप्ताह पाळायला भाग पाडत असाल तर याद राखा आम्ही तुमचे गुलाम नसून नक्षल सप्ताहाच्या नावाखाली आमच्यावर अन्याय करणे थांबवा असे गावक-यांनी नक्षलवाद्यांना आव्हानच दिले आहे. धीटपणे आणि निर्धाराने एकत्र येत नक्षलवादाचा विरोध आम्ही करत आहोत अश्या भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत. पुलखल,पेंढारी,तारगुडा,जयसिंगटोला,यरकड येथील गावक-यांनी नक्षल बॅनरची होळी करत नक्षलवादयां विरोधात घोषणा दिल्या. या वेळी मोठया प्रमाणावर गावकरी उपस्थित होते.





